अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे,

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,बारामती

# NOTICE

Notice No. 34 Displayed on- 06/10/2020

## कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी महत्वाची सूचना

शैक्षणिक वर्ष २०२०—२१ मध्ये ११ वी व १२ वी मध्ये सर्व शाखांमधील अनुदानितमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांनी ई.बी.सी/एफ.ई.जी/पी.टी.एफ/एस.टी.एफ. या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२०—२१ या वर्षात फी सवलतीमध्ये प्रवेश घेतलेला आहे अशा सर्व विद्यार्थ्यांनी आपले फी सवलतीचे फॉर्म व त्यासोबतची आवश्यक कागदपत्रे दि. १३/१०/२०२० ते १६/१०/२०२० या मुदतीत महाविद्यालयात (मेनगेट जवळ) हार्डकॉपी जमा करावी.

## ई.बी.सी. शिष्यवृत्ती (फक्त अनुदानित विद्यार्थ्यांसाठी)

११ वी व १२ मधील सर्व शाखेतील विद्यार्थी यासाठी अर्ज करु शकतात यासाठीची पात्रता व कागदपत्रे खालीलप्रमाणे आवश्यक आहेत.

१. विद्यार्थी हा ओपन कॅटेगरीतील असावा.

२. विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न १,००,०००/— (एक लाख) एवढे असावे व उत्पन्नाचा दाखला मा. तहसिलदार यांचा सन २०१९—२० मधील असावा.

३. ई.बी.सी. शिष्यवृत्तीचा अर्ज ग्राहक भांडारातून घ्यावा व सोबत उत्पन्नाचा दाखला जोडून महाविद्यालयात हार्ड कॉपी जमा करावी.

## एफ.ई.जी. शिष्यवृत्ती (फक्त अनुदानित वर्गातील मुलींसाठी)

११ वी व १२ मधील सर्व शाखेतील मुली यासाठी अर्ज करु शकतात यासाठीची पात्रता व कागदपत्रे खालीलप्रमाणे आवश्यक आहेत.

१. सर्व अनुदानित वर्गातील विद्यार्थीनी या फी माफीसाठी अर्ज करु शकतात

२. एस.टी/एस.सी/ओ.बी.सी/एस.बी.सी. या मागास प्रवर्गातील मुलींना एफ.ई.जी. फी सवलत घ्यावयाची असेल तर संबधित विद्यार्थीनींना पोस्ट मॅट्रीक भारत सरकारची शिष्यवृत्ती घेता येणार नाही याची नोंद घ्यावी.

३. एफ.ई.जी. शिष्यवृत्तीचा एक पानी फॉर्म ग्राहक भांडारातून घ्यावा व पूर्णपणे भरुन विद्यार्थीनी व पालकांची सही करुन महाविद्यालयात हार्ड कॉपी जमा करावी.

## एस.टी.एफ./पी.टी.एफ शिष्यवृत्ती (फक्त अनुदानित विद्यार्थ्यांसाठी)

१. ज्या विद्यार्थ्यांचे पालक हे माध्यमिक शिक्षक आहेत अशा विद्यार्थ्यांनी ग्राहक भांडारातून एस.टी.एफ अर्ज घेऊन मुख्याध्यापक यांची सही व संबधित शाळेचा शिक्का घेऊन हार्ड कॉपी महाविद्यालयात जमा करावी.

२. ज्या विद्यार्थ्यांचे पालक हे प्राथमिक शिक्षक आहेत अशा विद्यार्थ्यांनी ग्राहक भांडारातून पी.टी.एफ शिष्यवृत्तीचा अर्ज घेऊन मुख्याध्यापक यांची सही व संबधित शाळेचा शिक्का घेऊन हार्ड कॉपी महाविद्यालयात जमा करावा.

जे विद्यार्थी वरीलप्रमाणे दिलेल्या मुदतीत शिष्यवृत्तीचे फॉर्म व आवश्यक कागदपत्रे जमा करणार नाही अशा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणार नाही. व उर्वरित फी भरावी लागेल याची नोंद घ्यावी.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य